# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक : २५६०११८१-८२
फॅक्स : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई-मेल : regis@unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे-४११००७.

## जाहीर प्रकटन

विषय: भोजनगृहाच्या दरवाढी संदर्भात आपल्या निवेदनाबाबत...

प्रस्तुत विद्यापीठ परिपत्रक क्रमांक २०८/२०२६ अन्वये दिनांक १७/०९/२०२६ रोजीच्या प्रस्तुत विद्यापीठाच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने भोजनगृहाच्या दरात सुधारणा करण्यात आली होती. सदरच्या दरवाढीबद्दल विविध संघटनेने आक्षेप नोंदवून याबाबत फेरविचार करण्याची मागणी केली होती.

या अनुषंगाने आज दिनांक २६/०९/२०२६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत महाराष्ट्रात दुष्काळजन्य परिस्थिती असल्यामुळे सद्यस्थितीतील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सदरची दरवाढ पुढील महिन्यापासून लागू न करता रद्द करण्यात येत आहे, असा निर्णय घेतला आहे.

तसेच उपहारगृहाची गुणवत्ता राखण्यासाठी सर्व समित्यांचे पुनर्गठन करून कार्यपद्धती विहित करण्यासाठी मा. डॉ. जोत्स्ना एकबोटे, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. मा. व्यवस्थापन परिषदेने केलेल्या सकारात्मक कार्यवाहीच्या पार्श्वभूमीवर सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

ठिकाण :- पुणे
दिनांक:- २६/०९/२०२६

(श्री. ज्ञानेश्वर साळुंके)
उपकुलसचिव